# पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी-४११ ०१८.
## मा.स्थायी समिती

## कार्यपत्रिका क्रमांक - ६
## सभावृत्तांत

दिनांक - १५.५.२०१२ वेळ - दुपारी ३:०० वाजता

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.स्थायी समितीची साप्ताहिक सभा मंगळवार दिनांक १५.५.२०१२ रोजी दुपारी ३.०० वाजता महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

१) मा.जगदीश शेट्टी - सभापती
२) मा.अविनाश (दादा) टेकावडे
३) मा.चंद्रकांत (भाऊ) साहेबराव वाळके
४) मा.विनया प्रदिप (आबा) तापकीर
५) मा.छाया जगन्नाथ साबळे
६) मा.सौ.तनपुरे सुषमा राजेंद्र
७) मा.पाडाळे निता विलास
८) मा.जावेद रमजान शेख
९) मा.जगताप नवनाथ दत्तु
१०) मा.ठोंबरे सुभद्रा ईश्वर
११) मा.भोसले राहुल हनुमंतराव
१२)मा.भालेकर अरुणा दिलीप
१३) मा.अश्विनी गजानन चिंचवडे - पाटील
१४) मा.सोनकांबळे चंद्रकांता लक्ष्मण

याशिवाय मा.प्रकाश कदम-अति.आयुक्त,मा.सावंत-सह आयुक्त,मा.मुंढे,मा.बंब, मा.पवार,मा.गायकवाड,मा.ढेरे,मा.झुरे,मा.दुरगुडे-सहा.आयुक्त,मा.भंडारे-प्र.उपनगरसचिव, मा.सुरगुडे-विकास अभियंता, मा.चव्हाण-सह शहर अभियंता, मा.भोसले-मुख्यलेखापाल, मा.डॉ.अय्यर-प्र.आरोग्य वैद्यकीय अधिकारी, मा.दुधेकर,मा.ढगे, मा.निकम, मा.इंगळे,मा.चव्हाण,मा.जाधव, मा.कुदळे, मा.चिंचवडे, मा.कपिले, मा.थोरात,मा.पठाण, मा.कुलकर्णी - कार्य.अभियंता,मा.जाधव-शिक्षणाधिकारी (माध्यमिक ,मा.चव्हाण - आरोग्य कार्यकारी अधिकारी हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

----------

<u>उपस्थित सन्मा.सदस्यांचे संमतीप्रमाणे खालील ऐनवेळचे विषय सभा कामकाजात दाखल करुन घेणेत आले :-</u>

विषय क्रमांक २०) :- क प्रभाग निविदा नोटीस क्र.१/१२-१३ या कामाचा विषय माहितीसाठी ठेवणेबाबत..

विषय क्रमांक २१) :- कै.धोंडीबा फुगे पाटील क्रीडा मैदान भोसरी हे सेवा शुल्क तत्वावर चालविण्यास देणेबाबत..मा.विनया तापकीर,मा.चंद्रकांता सोनकांबळे यांचा प्रस्ताव..

विषय क्रमांक २२) :- राजमाता अहिल्यादेवी होळकर स्वयंरोजगार सेवा सहकारी संस्था यांस उद्यान देखभाल दुरुस्ती काम देणेबाबत..मा.अश्विनी चिंचवडे-पाटील,मा.सुषमा तनपुरे यांचा प्रस्ताव..

विषय क्रमांक २३) :- मनपा हद्दीतील जलनिःसारण नलिका व मॅनहोल चेंम्बरमधील गाळ यांत्रिकी पध्दतीने काढणेबाबत..मा.विनया तापकीर,मा.चंद्रकांता सोनकांबळे यांचा प्रस्ताव..

विषय क्रमांक २४) :- थ्री सिटर चेअर बेंचेस पुरविणेबाबत..मा.सुषमा तनपुरे,मा.निता पाडाळे याचां प्रस्ताव..

विषय क्रमांक २५) :- EWS प्रकल्पाच्या के व्ही स्विचींग स्टेशन उभारणेबाबत..मा.विनया तापकीर,मा.चंद्रकांता सोनकांबळे यांचा प्रस्ताव..

विषय क्रमांक २६) :- दवाखाने व रुग्णालये येथील भंगार साहित्य विक्रीबाबत..मा.विनया तापकीर,मा.चंद्रकांता सोनकांबळे यांचा प्रस्ताव..

विषय क्रमांक २७) :- ब्लॅकबेरी मोबाईल खरेदीबाबत.. ..मा.विनया तापकीर,मा.चंद्रकांता सोनकांबळे यांचा प्रस्ताव..

विषय क्रमांक २८) :- मानधनावर नेमणुक देणेबाबत..मा.चंद्रकांता सोनकांबळे,मा.अश्विनी चिंचवडे-पाटील यांचा प्रस्ताव..

विषय क्रमांक २९) :- गाळे भाडेतत्वावर चालविण्यास देणेबाबत..मा.विनया तापकीर , मा.चंद्रकांता सोनकांबळे यांचा प्रस्ताव..

विषय क्रमांक ३०) :- गाळे भाडेतत्वावर चालविण्यास देणेबाबत..मा.विनया तापकीर, मा.चंद्रकांता सोनकांबळे यांचा प्रस्ताव..

विषय क्रमांक ३१) :- गाळे भाडेतत्वावर चालविण्यास देणेबाबत..मा.विनया तापकीर, मा.चंद्रकांता सोनकांबळे यांचा प्रस्ताव..

विषय क्रमांक ३२) :- व्यायामशाळा सेवातत्वावर चालविण्यास देणेबाबत.. ..मा.विनया तापकीर,मा.चंद्रकांता सोनकांबळे यांचा प्रस्ताव..

विषय क्रमांक ३३) :- ठराव क्र.१०९४५ विषय क्र.४० दि.६/४/२०१० दुरुस्त करुन देण्याबाबत.. ..मा.विनया तापकीर,मा.चंद्रकांता सोनकांबळे यांचा प्रस्ताव..

विषय क्रमांक ३४) :- गाळे भाडेतत्वावर चालविण्यास देणेबाबत..मा.विनया तापकीर,मा.चंद्रकांता सोनकांबळे यांचा प्रस्ताव..

विषय क्रमांक ३५) :- गाळे भाडेतत्वावर चालविण्यास देणेबाबत..मा.विनया तापकीर,मा.चंद्रकांता सोनकांबळे यांचा प्रस्ताव..

विषय क्रमांक ३६) :- पिंपरी वाघेरे परिसरात टँकरने पाणीपुरवठा करणेबाबत.. ..मा.विनया तापकीर,मा.चंद्रकांता सोनकांबळे यांचा प्रस्ताव..

विषय क्रमांक ३७) :- चित्रपट निर्मीतीसाठी अनुदान मिळणेबाबत..मा.विनया तापकीर, मा.चंद्रकांता सोनकांबळे यांचा प्रस्ताव..

विषय क्रमांक ३८) :- अ,ब व ड प्रभागातील चेंबर साफ करुन घेणेबाबत.. ..मा.विनया तापकीर,मा.चंद्रकांता सोनकांबळे यांचा प्रस्ताव..

विषय क्रमांक ३९) :- क प्रभागातील चेंबर साफ करुन घेणेबाबत..मा.चंद्रकांता सोनकांबळे,मा.अश्विनी चिंचवडे-पाटील यांचा प्रस्ताव..

विषय क्रमांक ४०) :- सांगवी येथील मधुबन प्रभागातील हॉल श्री साई संस्कार स्वयंसहायता महिला बचतगटास वापरण्यास देणेबाबत..मा.सुषमा तनपुरे,मा.चंद्रकांता सोनकांबळे यांचा प्रस्ताव..

विषय क्रमांक ४१) :- भाजी मंडई साफ सफाईचे काम स्वयंरोजगार सेवा संस्थेस देणेबाबत.. ..मा.विनया तापकीर,मा.चंद्रकांता सोनकांबळे यांचा प्रस्ताव..

विषय क्रमांक ४२) :- तालेरा रुग्णालय येथे स्थापत्यविषयक दुरुस्ती देखभाल व सुधारणांची कामे करणेबाबत.. ..मा.विनया तापकीर,मा.चंद्रकांता सोनकांबळे यांचा प्रस्ताव..

विषय क्रमांक ४३) :- ब प्रभागातील नाले साफसफाई करणेबाबत..मा.अश्विनी चिंचवडे-पाटील,मा.अरुणा  भालेकर यांचा प्रस्ताव..

----------

दिनांक ८/५/२०१२ रोजी झालेल्या सभेचा (कार्यपत्रिका क्रमांक ५) सभावृत्तांत कायम करणेत आल्याचे मा. सभापती यांनी प्रकट केले.

----------

ठराव क्रमांक - ४८९ विषय क्रमांक - १
दिनांक - १५/५/२०१२ विभाग - मध्यवर्ती साहित्य भांडार (वैद्य)
सुचक :- मा.चंद्रकांत वाळके अनुमोदक :- मा.विनया तापकीर
संदर्भ:-मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.मसाभां/४/कावि/२३०/कावि/२०१२दि.३/५/१२

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

राष्ट्रीय कार्यक्रमाची प्रभावीपणे अंमलबजावणी करणेकामी खाजगी वाहन भाडे या लेखाशिर्षावर घेणेत आलेली ५ वाहने व शासकीय योजनेची अंमलबजावणी या लेखाशिर्षावर घेणेत आलेली ५ वाहने अशी एकूण १० वाहनांना प्रतिदिन प्रति ८० किमी साठी र.रू.८००/- व त्यापुढील प्रत्येक किमीसाठी र.रू.५/- यादराने १/४/२०१२ ते३०/९/२०१२ या कालावधीसाठी मुदतवाढ देणेस किंवा निविदा प्रक्रिया होईपर्यंत यापैकी जो कालावधी कमी असेल त्या कालावधीकरिता मुदतवाढ देणेस व सदर वाहनांच्या येणाऱ्या प्रत्यक्ष खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----

ठराव क्रमांक - ४९० विषय क्रमांक - २
दिनांक - १५/५/२०१२ विभाग - क प्रभाग
सुचक :- मा.राहुल भोसले अनुमोदक :- मा.सुभद्रा ठोंबरे
संदर्भ:-मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.कप्र/३/कावि/९/२०१२दि.४/५/१२

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

भारताची जनगणना २०११ दुसऱ्या टप्याचे कामकाजाकरिता आकस्मित खर्च र.रू.५०,०००/- (अग्रिम) मंजूर करणेत आलेला असून सदर कामकाजासाठी क प्रभाग कार्यालयाचा प्रत्यक्षात आकस्मित खर्च र.रू.५५,९५५/- झालेला असल्याने र.रू.५०,०००/- व जादा झालेला खर्च र.रू.५,९५५/- अशा एकूण र.रू.५५,९५५/- खर्चास कार्योत्तर मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----

ठराव क्रमांक - ४९१ विषय क्रमांक - ३
दिनांक - १५/५/२०१२ विभाग - पशुवैद्यकिय
सुचक :- मा.जावेद शेख अनुमोदक :- मा.सुषमा तनपुरे
संदर्भ:-मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.पवै/१/कावि/२८९/२०१२दि.३/५/१२

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

मनपा पिंपरी पुलाखालील मोठ्या जनावरांच्या कत्तलखान्याचे ठिकाणी दैनंदिन निर्माण होणाऱ्या कत्तलोत्तर घाणीची वाहनाव्दारे वाहतूक करून विल्हेवाट लावणेकामी

निविदा प्रक्रिया पुर्ण होवून नव्याने ठेकेदाराची नियुक्ती होईस्तोवर मे.पी.एम.ट्रान्सपोर्ट, नेहरूनगर, पिंपरी-१८. यांना त्यांचे जुन्याच दराने र.रू.१,१००/- [र.रू.एक हजार एकशे] प्रतिखेप कामकाज करणेस व याकामी येणाऱ्या प्रत्यक्ष खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----

ठराव क्रमांक - ४९२ विषय क्रमांक - ४
दिनांक - १५/५/२०१२ विभाग - आरोग्य मुख्य
सुचक :- मा.निता पाडाळे अनुमोदक :- मा.सुभद्रा ठोंबरे
संदर्भ:-मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.आमु/४/कावि/२३३/२०१२दि.५/५/१२

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

मनपा मुख्य इमारतीमध्ये राहिलेल्या ठिकाणी पुर्वीच्याच निविदा मधील मंजुर दरानुसार मे.वेस्ट कॉस्ट एंन्टरप्रायजेस लिमीटेड यांचेकडून करारनामा करून ३३ नग फॉल्कन वॉटर फ्री युरिनल्स बसवून घेणेस व ६६ नग कॉट्रेजचा पुरवठा करणे याकामी र.रू.७,८५,४००/- चे खर्चास व सदरचा खर्च आरोग्य मुख्य कार्यालयाकडील साफसफाई साहीत्य मशिनरी खरेदी करणे या लेखाशिर्षकातून खर्ची टाकण्यास तसेच संबंधीत ठेकेदाराकडून देखभाल दुरुस्ती दोन वर्षे कालावधीसाठी मोफत व नंतरच्या कालावधीमध्ये मनपाकडून फक्त कॉट्रेजची निविदा दरानुसार रक्कम अदा करणेत येवून देखभाल दुरुस्ती मोफत करून घेणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----

ठराव क्रमांक - ४९३ विषय क्रमांक - ५
दिनांक - १५/५/२०१२ विभाग - झोनिपु स्थापत्य
सुचक :- मा.छाया साबळे अनुमोदक :- मा.चंद्रकांत वाळके
संदर्भ:-मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.झोनिपु/स्था/नि/कावि/१३९/२०१२दि.३/५/१२

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

मनपाच्या झो.नि.पु.स्थापत्य विभागाकडील नि.नो.क्र.१/७४- २०११/१२ मधील अ.क्र.६१ अन्वये, प्रभाग क्र.३६ मधील स्वच्छतागृहाची देखभाल दुरुस्ती करणेकामी मे.शूभश्री कंन्स्ट्रक्शन (नि.र.रू.१३,११,१०३/- [र.रू.तेरा लाख अकरा हजार एकशे तीन] पेक्षा ५ % जास्त) या ठेकेदाराकडुन निविदा दर मंजुर दराने र.रू.१३,७६,६५८/- पर्यंत काम करून घेण्यास तसेच निविदा रकमेच्या ५ % पर्यंत निविदा अटीप्रमाणे डांबर, सिमेंट, लोखंड या तिन्ही मटेरियलच्या निर्धारीत केलेल्या बेसीक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/वसुल करणे बंधनकारक राहील या अटीस अधिन राहून करारनामा करून कामाचा आदेश देणेत आला असल्याने त्याचे अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----

ठराव क्रमांक - ४९४ विषय क्रमांक - ६
दिनांक - १५/५/२०१२ विभाग - विद्युत मुख्य
सुचक :- मा.अरुणा भालेकर अनुमोदक :- मा.अविनाश टेकावडे
संदर्भ:-मा.विकास अभियंता यांचे जा.क्र.वि/मुका/४/कावि/३३४/२०१२दि.५/५/१२

मा.विकास अभियंता यांनी शिफारस केलेप्रमाणे -

मनपाच्या विद्युत विभागाकडील नि.नो.क्र.१६/११/१२ मधील अ.क्र.५ अन्वये, यशवंतराव चव्हाण स्मृती रूग्णालय येथील पाणीपुरवठा यंत्रणा व अग्निशामक यंत्रणेची वार्षिक पध्दतीने चालन, देखभाल व दुरुस्ती करणेकामी मे.अनमेक इलेक्ट्रिकल प्रा.लि. (नि.र.रू.८,८८,४६६/- [र.रू.आठ लाख अठठ्याऐंशी हजार चारशे सहासष्ट] पेक्षा ३.०० % जास्त) या ठेकेदाराकडून करारनामा करून कामाचा आदेश देणेत आला असल्याने त्याचे अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----

ठराव क्रमांक - ४९५ विषय क्रमांक - ७
दिनांक - १५/५/२०१२ विभाग - विद्युत मुख्य
सुचक :- मा.नवनाथ जगताप अनुमोदक :- मा.राहुल भोसले
संदर्भ:-मा.विकास अभियंता यांचे जा.क्र.वि/मुका/४/कावि/३३६/२०१२दि.५/५/१२

मा.विकास अभियंता यांनी शिफारस केलेप्रमाणे -

मनपाच्या विद्युत विभागाकडील नि.नो.क्र.१२/११/१२ मधील अ.क्र.१४ अन्वये, पिंपरी येथील वॉर्ड क्र.७४ मधील जलतरण तलाव येथील विद्युत विषयक कामे करणेकामी मे.पी.व्ही.आर. एस.इलेक्ट्रिकल्स अँड इंजिनिअर्स (नि.र.रू.५,३९,३२८/- [र.रू. पाच लाख एकोणचाळीस हजार तीनशे अठ्ठावीस] पेक्षा १७.१७% कमी) या ठेकेदाराकडून करारनामा करून कामाचा आदेश देणेत आला असल्याने त्याचे अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----

ठराव क्रमांक - ४९६ विषय क्रमांक - ८
दिनांक - १५/५/२०१२ विभाग - क्रिडा
सुचक :- मा.अरुणा भालेकर अनुमोदक :- मा.जावेद शेख
संदर्भ:-१) मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.क्रीडा/४/कावि/१०५/२०१२दि.२९/३/१२

२) मा.क्रिडा समिती सभा दिनांक २/५/२०१२ ठराव क्र.५

मनपा परिसरातील शालेय १०६ विद्यार्थी खेळाडूंना सन २०१०-११ ची क्रिडा शिष्यवृत्ती एकूण र.रू.३,८२,०००/- अदा करणेस व त्याकामी येणाऱ्या खर्चास कार्योत्तर मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----

ठराव क्रमांक - ४९७ विषय क्रमांक - ९
दिनांक - १५/५/२०१२ विभाग - प्रशासन
सुचक :- मा.चंद्रकांता सोनकांबळे अनुमोदक :- मा.राहुल भोसले
संदर्भ:-१) मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.प्रशा/१/कावि/२६९/२०१२दि.७/४/१२
२) मा.विधी समिती सभा दि.७/५/२०१२ ठ.क्र.७
विषय :- महापालिकेचे दोन जादा प्रभाग निर्माण करणेबाबत..

विषय क्रमांक ९ चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----

ठराव क्रमांक - ४९८ विषय क्रमांक - १०
दिनांक - १५/५/२०१२ विभाग - मुख्य लेखा परिक्षक
सुचक :- मा.जावेद शेख अनुमोदक :- मा.सुभद्रा ठोंबरे
संदर्भ:-मा.मुख्य लेखा परिक्षक यांचे जा.क्र.मुलेप/१/कावि/१८/२०१२दि.८/५/१२

मा.मुख्य लेखा परिक्षक यांनी शिफारस केलेप्रमाणे -

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १०५ (१) अन्वये लेखापरिक्षण विभागाकडील माहे जानेवारी २०१२ मधिल अद्ययावत एकूण कामकाज विषयक गोषवारा अहवाल अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----

ठराव क्रमांक - ४९९ विषय क्रमांक - ११
दिनांक - १५/५/२०१२ विभाग - मुख्य लेखा परिक्षक
सुचक :- मा.विनया तापकीर अनुमोदक :- मा.छाया साबळे
संदर्भ:-मा.मुख्य लेखा परिक्षक यांचे जा.क्र.मुलेप/१/कावि/१९/२०१२दि.८/५/१२

मा.मुख्य लेखा परिक्षक यांनी शिफारस केलेप्रमाणे -

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १०५ (१) अन्वये लेखापरिक्षण विभागाकडील माहे फेब्रुवारी, २०१२ मधिल अद्ययावत एकूण कामकाज विषयक गोषवारा अहवाल अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----

ठराव क्रमांक - ५०० विषय क्रमांक - १२
दिनांक - १५/५/२०१२ विभाग - मुख्य लेखा परिक्षक
सुचक :- मा.सुभद्रा ठोंबरे अनुमोदक :- मा.नवनाथ जगताप
संदर्भ:-मा. मुख्य लेखा परिक्षक यांचे जा.क्र. मुलेप/१/कावि/२०/२०१२दि.८/५/१२

मा. मुख्य लेखा परिक्षक यांनी शिफारस केलेप्रमाणे -

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १०५ (१) अन्वये लेखापरिक्षण विभागाकडील माहे मार्च २०१२ मधिल अद्ययावत एकूण कामकाज विषयक गोषवारा अहवाल अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----

ठराव क्रमांक - ५०१ विषय क्रमांक - १३
दिनांक - १५/५/२०१२ विभाग - नागरवस्ती विकास योजना
सुचक :- मा.विनया तापकीर अनुमोदक :- मा.चंद्रकांता सोनकांबळे
संदर्भ:-मा.महापालिका अति.आयुक्त यांचे जा.क्र.नावियो/५/कावि/३०/२०१२दि.३/५/१२

मा.महापालिका अति.आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

मनपा मागासवर्गीय कल्याणकारी योजनेअंतर्गत घटक योजना क्र.५ अनुसार २०११-१२ या आर्थिक वर्षातील इ.१२ वी. नंतरचे वैद्यकीय (MBBS) अभियांत्रिकी, संगणक प्रथम वर्ष पदवी यासारखे उच्च शिक्षण घेणारे युवक/युवतींना अर्थसहाय्य देणे योजनेअंतर्गत १)अनुराग अनिल माने, मॅकॅनिकल इंजिनिअरिंग २)सचिन बाबासाहेब खेडकर, कॉम्प्युटर इंजिनिअरिंग ३)अश्विनी कामराज मेंढे, कॉम्प्युटर इंजिनिअरिंग यांचे अर्ज पात्र झाले असून सदर अर्जदारांना प्रत्येकी र.रू.१०,०००/- याप्रमाणे एकूण र.रू.३०,०००/- खर्च अपेक्षित असल्याने सदर खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----

ठराव क्रमांक - ५०२ विषय क्रमांक - १४
दिनांक - १५/५/२०१२ विभाग - कायदा
सुचक :- मा.अविनाश टेकावडे अनुमोदक :- मा.सुभद्रा ठोंबरे
संदर्भ:-मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.कास/६/कावि/१३३/२०१२दि.८/५/१२

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

मनपाच्या शिवाजीनगर न्यायालयातील कोर्ट चेंबर इमारतीचे दैनंदीन देखभाल व दुरुस्तीचे कामकाज पाहणारे न्यु लॉयर्स चेंबर्स कमिटी, पुणे यांनी सन २०११-१२ व सन २०१२-१३ या वर्षाकरिता मनपाकडे मागणी केलेली देखभाल व दुरुस्तीची प्रतीवर्ष र.रू.२,५००/- प्रमाणे र.रू.५,०००/- व भुईभाडे २०१२ ते १७ या कालावधीचे र.रू. १,५००/- एकूण र.रू.६,५००/- न्यु लॉयर्स चेंबर्स कमिटी, पुणे यांना अदा करणेस व सदरचा खर्च कायदा विभागाकडील मनपा न्यायालय अस्थापना खर्च या लेखाशिर्षावरून खर्ची टाकणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----

ठराव क्रमांक - ५०३ विषय क्रमांक - १५
दिनांक - १५/५/२०१२ विभाग - संगणक
सुचक :- मा.सुषमा तनपुरे अनुमोदक :- मा.राहुल भोसले
संदर्भ:-मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र. संगणक/२/कावि/११२/२०१२दि.१०/५/१२
विषय :- संगणक यंत्रणेच्या वार्षिक देखभाल व दुरुस्तीचे कामाबाबत..

विषय क्रमांक १५ चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----

ठराव क्रमांक - ५०४ विषय क्रमांक - १६
दिनांक - १५/५/२०१२ विभाग - मुख्य लेखा परिक्षक
सुचक :- मा.अश्विनी चिंचवडे-पाटील अनुमोदक :- मा.सुभद्रा ठोंबरे
संदर्भ:-मा.मुख्य लेखा परिक्षक यांचे जा.क्र.मुलेप/१/कावि/२१/२०१२दि.९/५/१२

मा.मुख्य लेखा परिक्षक यांनी शिफारस केलेप्रमाणे -

प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १०५ (१) अन्वये लेखापरिक्षण विभागातील दि.२.४.१२ ते ८.४.१२ अखेर संपणा-या आठवड्याचा, मा.मुख्यलेखापरिक्षक यांनी क्र.मुलेप/१/कावि/२१/२०१२ दि.९.५.२०१२ अन्वये पाठविलेला साप्ताहिक लेखा तपासणी कामाचा अहवाल अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----

ठराव क्रमांक - ५०५ विषय क्रमांक - १७
दिनांक - १५/५/२०१२ विभाग - मुख्य लेखा परिक्षक
सुचक :- मा.छाया साबळे अनुमोदक :- मा.जावेद शेख
संदर्भ:-मा.मुख्य लेखा परिक्षक यांचे जा.क्र.मुलेप/१/कावि/२२/२०१२दि.९/५/१२

मा.मुख्य लेखा परिक्षक यांनी शिफारस केलेप्रमाणे -

प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १०५ (१) अन्वये लेखापरिक्षण विभागातील दि.९.४.१२ ते १५.४.१२ अखेर संपणा-या आठवड्याचा, मा.मुख्यलेखापरिक्षक यांनी क्र.मुलेप/१/कावि/२२/२०१२ दि.९.५.२०१२ अन्वये पाठविलेला साप्ताहिक लेखा तपासणी कामाचा अहवाल अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----

ठराव क्रमांक - ५०६ विषय क्रमांक - १८
दिनांक - १५/५/२०१२ विभाग - मुख्य लेखा परिक्षक
सुचक :- मा.अरुणा भालेकर अनुमोदक :- मा.चंद्रकांता सोनकांबळे
संदर्भ:-मा.मुख्य लेखा परिक्षक यांचे जा.क्र.मुलेप/१/कावि/२३/२०१२दि.९/५/१२

मा.मुख्य लेखा परिक्षक यांनी शिफारस केलेप्रमाणे -

प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १०५ (१) अन्वये लेखापरिक्षण विभागातील दि.१६.४.१२ ते २२.४.१२ अखेर संपणा-या आठवड्याचा, मा.मुख्यलेखापरिक्षक यांनी क्र.मुलेप/१/कावि/२३/२०१२ दि.९.५.२०१२ अन्वये पाठविलेला साप्ताहिक लेखा तपासणी कामाचा अहवाल अवलोकन करणेत येत आहे..

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----

ठराव क्रमांक - ५०७ विषय क्रमांक - १९
दिनांक - १५/५/२०१२ विभाग - मुख्य लेखा परिक्षक
सुचक :- मा.राहुल भोसले अनुमोदक :- मा.सुभद्रा ठोंबरे
संदर्भ:-मा.मुख्य लेखा परिक्षक यांचे जा.क्र.मुलेप/१/कावि/२४/२०१२दि.९/५/१२

मा.मुख्य लेखा परिक्षक यांनी शिफारस केलेप्रमाणे -

प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १०५ (१) अन्वये लेखापरिक्षण विभागातील दि.२३.४.१२ ते २९.४.१२ अखेर संपणा-या आठवड्याचा,

मा.मुख्यलेखापरिक्षक यांनी क्र.मुलेप/१/कावि/२४/२०१२ दि.९.५.२०१२ अन्वये पाठविलेला साप्ताहिक लेखा तपासणी कामाचा अहवाल अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----

सभा कामकाजात दाखल करुन घेणेत आलेले विषय घेणेत आले

ठराव क्रमांक - ५०८ विषय क्रमांक - २०
दिनांक - १५/५/२०१२ विभाग - क प्रभाग
सुचक :- मा.चंद्रकांता सोनकांबळे अनुमोदक :- मा.चंद्रकांत वाळके
संदर्भ:-मा.प्रभाग अधिकारी यांचे जा.क्र.कप्र/आ/१५/कावि/४८१/१२दि.८/५/१२

मा.प्रभाग अधिकारी यांनी शिफारस केलेप्रमाणे -

मनपाच्या क प्रभाग कार्यालयाकडील नि.नो.क्र.१/१२-१३ अन्वये, क प्रभाग कार्यक्षेत्रातील नाले खरडुन साफ करणे व त्यातुन निघालेला गाळ, कचरा, राडारोडा वाहतुक करुन मोशी कचरा डेपो किंवा क प्रभाग कार्यक्षेत्रातील खाणीमध्ये खाली करुन पसरुन देणेकामी मे.सिध्दीविनायक ट्रान्सपोर्ट [नि.र.रु. ५,६६,५६२/- ( र.रु. पाच लाख सहासष्ठ हजार पाचशे बासष्ठ) पेक्षा (-) २% आणखी १% कमी] या ठेकेदाराबरोबर करारनामा करुन कामाचा आदेश देणेत येत असल्याने त्याचे अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----

ठराव क्रमांक - ५०९ विषय क्रमांक - २१
दिनांक - १५/५/२०१२
सुचक :- मा.विनया तापकीर अनुमोदक :- मा.चंद्रकांता सोनकांबळे

संदर्भ:-मा.विनया तापकीर, मा.चंद्रकांता सोनकांबळे यांचा प्रस्ताव..

पै.धोंडीबा फुगे पाटील क्रीडा मैदान भोसरी हे शिवराज मुद्रा प्रतिष्ठान या संस्थेस द.म.र.रु.२५,०००/- अंशत: सेवा शुल्क तत्वावर एक वर्ष कालावधीकरीता देखभाल संरक्षणाकामी देण्यास व त्याकामी येणा-या प्रत्यक्ष खर्चास मान्यता देणेत येत आहे.सभावृत्तांत कायम होण्याची वाट न पहाता ठरावाप्रमाणे कार्यवाही करण्यात यावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----

ठराव क्रमांक - ५१० विषय क्रमांक - २२
दिनांक - १५/५/२०१२
सुचक :- मा.अश्विनी चिंचवडे-पाटील अनुमोदक :- मा.सुषमा तनपुरे

संदर्भ:-मा.अश्विनी चिंचवडे - पाटील,मा.सुषमा तनपुरे यांचा प्रस्ताव..

चिंचवड मधील १) श्रध्दा गार्डन (गावडे कॉलनी) २) चापेकर स्मारक उद्यान(चापेकर वाचनालय), ३) कै.वस्ताद बाळासो गावडे जलतरण तलाव उद्यान ४) सिल्व्हर गार्डन (सिल्व्हर गार्डन उद्यान) या चार उद्यानाचे काम मे.निसर्ग लॅण्डस्केप यांचेकडुन योग्य पध्दतीने देखभाल होत नाही अशा नागरीक व वृत्तपत्राच्या माध्यमातुन तक्रारी आहेत. त्यामुळे त्याचे ( ठेका) राजमाता अहिल्यादेवी होळकर स्वयंरोजगार सेवा

सहकारी संस्था या सेवाभावी संस्थेस वरील चार (४) उद्यानाचे देखभाल दुरुस्तीचे काम देणेत यावे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----

ठराव क्रमांक - ५११ विषय क्रमांक - २३
दिनांक - १५/५/२०१२
सुचक :- मा. विनया तापकीर अनुमोदक :- मा. चंद्रकांता सोनकांबळे
संदर्भ:-मा.विनया तापकीर,मा. चंद्रकांता सोनकांबळे यांचा प्रस्ताव..

पिंपरी चिंचवड महानगरपालिका हद्दीतील जलनि:सारण नलिका व मॅनहोल चेंम्बर्सची साफ सफाई यापुर्वी मे.सुरज कॉन्ट्रॅक्टर यांचे मार्फत करणेत येत होती. त्यावेळेस साफ सफाईची कामे वेळेवर होत होती. सद्यस्थितीत सदरचे काम मे. बॅबोलेट असोसिएट्स यांचेमार्फत करणेत येत आहे. मे.बॅबोलेट असोसिएट्स यांचेकडे सद्यस्थितीत जबाबदारीने काम करणारे एकही सुपरवायझर नाही. साफसफाई करणेसाठी कर्मचारी अपुरे आहेत. त्यामुळे तक्रारींचे प्रमाण वाढलेले आहे. चारही प्रभागातील कामे एकाच ठेकेदाराकडे असल्याने सदर ठेकेदाराची साफ सफाई करणेची क्षमता नसल्याने त्या ठेकेदाराकडे दोन प्रभाग देऊन उर्वरीत दोन प्रभागांसाठी स्वतंत्र निविदा काढुन इतर ठेकेदारास देणेत यावी. म्हणजे सदर कामामध्ये स्पर्धा होऊन काम वेळेत पुर्ण होईल व मनपाचे आर्थिक नुकसान टाळेल व काम अधिक तत्परतेने होईल. तरी दोन प्रभागासाठी स्वतंत्र निविदा मागविणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----

ठराव क्रमांक - ५१२ विषय क्रमांक - २४
दिनांक - १५/५/२०१२
सुचक :- मा.सुषमा तनपुरे अनुमोदक :- मा.निता पाडाळे
संदर्भ:-मा. सुषमा तनपुरे,मा.निता पाडाळे यांचा प्रस्ताव..

सन २०१२ - १३ या वर्षाकरीता मा.आयुक्त यांनी यापुर्वीच्या मंजुरी दिलेल्या प्रस्तावानुसार मनपाच्या एकुण ६४ प्रभागामध्ये परफोरेटेड थ्री सिटर चेअर बेंचेस पुरविणे व बसविणे या कामासाठी मे. देव कंन्स्ट्रक्शन यांचा पुर्वानुभव लक्षात घेता या पुर्वीच्या मंजुर निविदा (२/९४/२००७-२००८) दरानुसार ५,४५०/- (र.रुपये पाच हजार चारशे पन्नास फक्त) प्रती नगास ७.९% कमी या दराने प्रत्येक प्रभागामध्ये पुढील ३ वर्षे कालावधीसाठी प्रतिवर्षी ५० नग अथवा त्यापेक्षा जास्त म्हणजेच सन्मा.नगरसदस्यांच्या मागणीप्रमाणे तसेच त्यासाठी येणा-या प्रत्यक्ष खर्चास मान्यता देणेत येत आहे. तसेच सदरचे काम मनपाचे अ ब क ड या ४ प्रभागांमार्फत (स्थापत्य विभाग) प्रत्येक प्रभागामार्फत ५० लाख रुपये पर्यंतचे खर्चास मे.देव कन्स्ट्रक्शन यांचेकडुन निविदा न मागविता पुर्वीच्या मंजुर दरानुसार थेट पध्दतीने खरेदी करुन घेण्यास मान्यता देणेत येत आहे. या कामासाठी लागणारी तरतुद सन २०१२-१३ या अर्थसंकल्पामध्ये बेंचेस पुरविणे व बसविणे या लेखाशिर्षामधुन करण्यात यावी. तसेच ज्या ठिकाणी तरतुद उपलब्ध नसेल त्याठिकाणी सदरचे काम वॉर्ड स्तरीय योजनेअंतर्गत कामे करणे या लेखाशिर्षातुन

खर्च करण्यास मान्यता देणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठरावाप्रमाणे कार्यवाही करणेत यावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

ठराव क्रमांक - ५१३ विषय क्रमांक - २५
दिनांक - १५/५/२०१२
सुचक :- मा.विनया तापकीर अनुमोदक :- मा.चंद्रकांता सोनकांबळे
संदर्भ:-मा.विनया तापकीर, चंद्रकांता सोनकांबळे यांचा प्रस्ताव..

मनपाचे EWS प्रकल्पाच्या २२/२२ के व्ही स्विचींग स्टेशन उभारण्याचे काम नि.नो.क्र. १२/३/२०१०-११ अन्वये मे.ॲनमेक इलेक्ट्रीकल्स प्रा.लि. करीत आहेत. सदरचे काम पूर्ण कार्यान्वीत करण्यासाठी म.रा.वी.कं.लि. यांच्या मंजुर अंदाजपत्रकानुसार सदरच्या स्वीचींग स्टेशनला विज जोड व विद्युत अनुषंगी कामे करणे आवश्यक आहे. सदर काम मे.ॲनमेक इलेक्ट्रीकल्स प्रा.लि. यांचा पुर्वानुभव व कामाची तातडी विचारात घेता निवीदा नोटीस क्र १२/३/२०१०-११ चे मंजुर लघूत्तम निवीदा दराने म्हणजेच २४.३४% कमी दराने मे.ॲनमेक इलेक्ट्रीकल्स प्रा.लि.यांच्या कडुन करुन घेण्यास व त्याकामी येणा-या र.रु. सहा कोटी दहा लाख पर्यंतचे वाढीव खर्चास मान्यता देणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होण्याची वाट न पहाता ठरावाप्रमाणे कार्यवाही करण्यात यावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---

ठराव क्रमांक - ५१४ विषय क्रमांक - २६
दिनांक - १५/५/२०१२
सुचक :- मा.विनया तापकीर अनुमोदक :- मा.चंद्रकांता सोनकांबळे
संदर्भ:-मा.विनया तापकीर, मा.चंद्रकांता सोनकांबळे यांचा प्रस्ताव..

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वैद्यकिय विभागाअंतर्गत येणारे दवाखाने/रुग्णालये व यशवंतराव चव्हाण स्मृती रुग्णालय येथील भंगार साहित्य व हायपोसोल्युशन विक्रीकरीता मे गॅब ॲडव्हरटायझींग संत तुकाराम नगर यांना या पुर्वीच्या मंजुर निविदा दराने थेट पध्दतीने सदरच्या कामाची मुदत संपल्या तारखेनंतर पुढील ३ वर्षाकरीता मुदत वाढ देण्यास व त्याकामी करारनामा करण्यास मान्यता देणेकामी मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होण्याची वाट न पहाता ठराव मा.महापालिका सभेकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----

ठराव क्रमांक - ५१५ विषय क्रमांक - २७
दिनांक - १५/५/२०१२
सुचक :- मा.विनया तापकीर अनुमोदक :- मा.चंद्रकांता सोनकांबळे

संदर्भ:-मा.विनया तापकीर, मा.चंद्रकांता सोनकांबळे यांचा प्रस्ताव..

मा.अध्यक्ष, स्थायी समिती यांस कार्यालयीन कामकाजासाठी मे.ब्लॅकबेरी कंपनीचा मॉडेल क्र.९७९० (बोल्ड - ५) हा मोबाइल ब्लॅकबेरी कंपनीचे अधिकृत पुरवठाधारक मे.एन.एस.जैन यांचेकडुन खरेदी करणेस व येणा-या संपुर्ण र.रु.२५,६९२/- चे खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----

ठराव क्रमांक - ५१६ विषय क्रमांक - २८
दिनांक - १५/५/२०१२
सुचक :- मा.चंद्रकांता सोनकांबळे अनुमोदक :- मा.अश्विनी चिंचवडे

संदर्भ:-मा.चंद्रकांता सोनकांबळे, मा.अश्विनी चिंचवडे यांचा प्रस्ताव..

१) डॉ.कांबळे बी जी २) डॉ.घागरे विजया यशवंत व ३) डॉ.बरई सुशीला धिरेंद्र यांना वाय सी एम रुग्णालयामध्ये डॉक्टर म्हणुन सहा महिने कालावधीसाठी द.म.र.रु. १२,०००/- एकत्रित मानधनावर घेण्यास मान्यता देणेत येत आहे. यापुर्वी ही त्यांनी वाय.सी.एम मध्ये सेवा केली आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----

ठराव क्रमांक - ५१७ विषय क्रमांक - २९
दिनांक - १५/५/२०१२
सुचक :- मा.विनया तापकीर अनुमोदक :- मा.चंद्रकांता सोनकांबळे

संदर्भ:-मा.विनया तापकीर, मा.चंद्रकांता सोनकांबळे यांचा प्रस्ताव..

मौजे पिंपरी भाजी मंडई येथील अ.क्र. १३३ लगत ३८ व्यापारी गाळे आहेत त्यापैकी काही गाळे मनपा दराने भाडे भाडेतत्वावर देणेत आले आहेत. त्यामधील रिक्त गाळयांपैकी गाळा क्रमांक २७(27) सौ.छबीदा गलपलु राहणार कैलास नगर पिंपरी यांना ५ वर्षे कालावधीकरिता मनपाने ठरविलेल्या दराप्रमाणे देणेत यावे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----

ठराव क्रमांक - ५१८ विषय क्रमांक - ३०
दिनांक - १५/०५/२०१२
सुचक :- मा.विनया तापकीर अनुमोदक:- मा.चंद्रकांता सोनकांबळे
संदर्भ:-मा.विनया तापकीर, मा.चंद्रकांता सोनकांबळे यांचा प्रस्ताव...

मौजे पिंपरी भाजीमंडई येथील अ.क्र.१३३लगत ३८ व्यापारी गाळे आहेत. त्यापैकी काही गाळे मनपा दराने भाडेतत्वावर देणेत आली आहेत. त्यामधील रिक्त गाळ्यांपैकी

गाळा क्र. २३ श्री.इम्तियाज बरखतआमी आतार, राहणार गांधीनगर, पिंपरी १७ यांना ५ वर्षे कालावधीकरिता मनपाने ठरविलेल्या दराप्रमाणे देणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----

ठराव क्रमांक - ५१९ विषय क्रमांक - ३१
दिनांक - १५/०५/२०१२
सुचक :- मा.विनया तापकीर अनुमोदक:- मा.चंद्रकांता सोनकांबळे
संदर्भ:-मा.विनया तापकीर, मा.चंद्रकांता सोनकांबळे यांचा प्रस्ताव...

मौजे पिंपरी भाजीमंडई येथील अ.क्र.१३३लगत ३८ व्यापारी गाळे आहेत. त्यापैकी काही गाळे मनपा दराने भाडेतत्वावर देणेत आली आहेत. त्यामधील रिक्त गाळ्यांपैकी गाळा क्र. ११ श्री.राजपाल दुलारे परदेशी,राहणार पत्राशेड पिंपरी १७ यांना ५ वर्षे कालावधीकरिता मनपाने ठरविलेल्या दराप्रमाणे देणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----

ठराव क्रमांक - ५२० विषय क्रमांक - ३२
दिनांक - १५/०५/२०१२
सुचक :- मा.विनया तापकीर अनुमोदक:- मा.चंद्रकांता सोनकांबळे
संदर्भ:-मा.विनया तापकीर, मा.चंद्रकांता सोनकांबळे यांचा प्रस्ताव...

प्रभाग क्र.२० (चिंचवडेनगर) मध्ये श्रीगणेश व्यायामशाळा नव्याने बांधण्यात आली आहे.ती व्यायामशाळा ‘बिजलीनगर युवा प्रतिष्ठाण’ या संस्थेस अंशतः सेवाशुल्क तत्वावर चालविण्यास देण्यास व त्याकामी येणाऱ्या प्रत्यक्ष खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----

ठराव क्रमांक - ५२१ विषय क्रमांक - ३३
दिनांक - १५/०५/२०१२
सुचक :- मा.विनया तापकीर अनुमोदक:- मा.चंद्रकांता सोनकांबळे
संदर्भ:-मा.विनया तापकीर, मा.चंद्रकांता सोनकांबळे यांचा प्रस्ताव...

ठराव क्र.१०९४५ दि.६/४/२०१० अन्वये चिंचवड येथील दत्तात्रय मरळ उद्यान किमान वेतन दरावर ५ वर्षे कालावधीकरीता ‘आखील बिजलीनगर प्रतिष्ठाण’ यांना देण्याचे मान्य झाले आहे. सदर ठरावामध्ये ‘आखील बिजलीनगर प्रतिष्ठाण’ ऐवजी ‘बिजलीनगर युवा प्रतिष्ठान’ या नावाने दुरुस्ती करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----

ठराव क्रमांक - ५२२ विषय क्रमांक - ३४
दिनांक - १५/०५/२०१२
सुचक :- मा.विनया तापकीर अनुमोदकः- मा.चंद्रकांता सोनकांबळे
संदर्भ:-मा.विनया तापकीर, मा.चंद्रकांता सोनकांबळे यांचा प्रस्ताव...

मौजे पिंपरी भाजीमंडई येथील अ.क्र.१३३लगत ३८ व्यापारी गाळे आहेत. त्यापैकी काही गाळे मनपा दराने भाडेतत्वावर देणेत आली आहेत. त्यामधील रिक्त गाळ्यांपैकी गाळा क्र. ३५ श्री.भारत रामचंद्र गायकवाड,राहणार बौद्धनगर, बि.९ रु.नं.२३ यांना ५ वर्षे कालावधीकरिता मनपाने ठरविलेल्या दराप्रमाणे देणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----

ठराव क्रमांक - ५२३ विषय क्रमांक - ३५
दिनांक - १५/०५/२०१२
सुचक :- मा.विनया तापकीर अनुमोदकः- मा.चंद्रकांता सोनकांबळे
संदर्भ:-मा.विनया तापकीर, मा.चंद्रकांता सोनकांबळे यांचा प्रस्ताव...

मौजे पिंपरी भाजीमंडई येथील अ.क्र.१३३लगत ३८ व्यापारी गाळे आहेत. त्यापैकी काही गाळे मनपा दराने भाडेतत्वावर देणेत आली आहेत. त्यामधील रिक्त गाळ्यांपैकी गाळा क्र. २२ श्री.कैलाश रामचंद्र गायकवाड,राहणार बौद्धनगर,पिंपरी यांना ५ वर्षे कालावधीकरिता मनपाने ठरविलेल्या दराप्रमाणे देणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----

ठराव क्रमांक - ५२४ विषय क्रमांक - ३६
दिनांक - १५/०५/२०१२
सुचक :- मा.विनया तापकीर अनुमोदकः- मा.चंद्रकांता सोनकांबळे
संदर्भ:-मा.विनया तापकीर, मा.चंद्रकांता सोनकांबळे यांचा प्रस्ताव...

मे.फ्रेन्डस् वॉटर सप्लायर्स पिंपरी पुणे १७ यांचेमार्फत जलक्षेत्र क्र. ५/१५ पिंपरी वाघेरे परिसरात टँकरने पाणीपुरवठा करणे (नि.नो.क्र.१/९४/२०११-१२) चे काम चालु असुन त्यांची मुदत ५/८/२०१२ रोजी संपत असल्याने व त्यांना त्यांचा पुर्वानुभव चांगला असल्याने त्यांना मुदत संपलेनगर पुढे २ वर्षे मुदतवाढ देवून व निविदेतील दराने काम देवून येणाऱ्या बीलांची अदायगी करण्यास व त्यासाठी येणाऱ्या प्रत्यक्ष खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----

ठराव क्रमांक - ५२५ विषय क्रमांक - ३७
दिनांक - १५/०५/२०१२
सुचक :- मा.विनया तापकीर अनुमोदकः- मा.चंद्रकांता सोनकांबळे
संदर्भ:-मा.विनया तापकीर, मा.चंद्रकांता सोनकांबळे यांचा प्रस्ताव...

स्काय ब्ल्यू मल्टीमिडीया स्त्री शिक्षणाच्या जनक सावित्रिबाई फुले चित्रपट निर्मितीसाठी पिंपरी चिंचवड महानगरपालिकेतर्फे अनुदान मिळणेकामी अर्ज केला आहे. तरी त्यास मनपातर्फे र.रु.दहा लाख अनुदान मंजूर करणेस मान्यता देणेकामी (३०

लाखाचे मर्यादे व्यतिरिक्त शासन मान्यतेच्या अटीवर) महापालिका सभेकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होण्याची वाट न पहाता ठराव मा.महापालिका सभेकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----

ठराव क्रमांक - ५२६ विषय क्रमांक - ३८

दिनांक - १५/०५/२०१२

सुचक :- मा.विनया तापकीर अनुमोदक:- मा.चंद्रकांता सोनकांबळे

संदर्भ:-मा.विनया तापकीर, मा.चंद्रकांता सोनकांबळे यांचा प्रस्ताव...

सिद्धीविनायक ट्रान्सपोर्ट यांचेकडे स्टॉर्म वॉटर चेंबर साफ करण्याची यंत्रणा उपलब्ध असून कामाची तातडी व त्यांचा कामाचा पुर्वानुभव लक्षात घेता पिं.चिं.मनपा परिसरामधील अ,ब व ड प्रभागामधील स्टॉर्म वॉटर चेंबर त्यांचेकडून आवश्यकतेनुसार अंदाजपत्रकीय दराने साफ करुन घेण्यास व त्याकामी येणाऱ्या प्रत्यक्ष खर्चास (३० लाखाचे मर्यादेत अधीन राहून) मान्यता देणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होण्याची वाट न पहाता ठरावाप्रमाणे कार्यवाही करणेत यावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----

ठराव क्रमांक - ५२७ विषय क्रमांक - ३९

दिनांक - १५/०५/२०१२

सुचक :- मा.चंद्रकांता सोनकांबळे अनुमोदक:- मा.अश्विनी चिंचवडे

संदर्भ:- मा.चंद्रकांता सोनकांबळे, मा.अश्विनी चिंचवडे यांचा प्रस्ताव...

क प्रभाग मधील स्ट्रॉम वॉटर चेंबर साफसफाई करण्याचे काम संत गाडगेबाबा महाराज बेरोजगार संस्था या संस्थेस देण्यास मान्यता देणेत येत आहे.(दहा लाख मर्यादेच्या अधीन राहून)

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----

ठराव क्रमांक - ५२८ विषय क्रमांक - ४०

दिनांक - १५/०५/२०१२

सुचक :-मा.सुषमा तनपुरे अनुमोदक:- मा.चंद्रकांता सोनकांबळे

संदर्भ:-मा.सुषमा तनपुरे, मा.चंद्रकांता सोनकांबळे यांचा प्रस्ताव...

सांगवी येथील मधुबन प्रभागातील आनंदनगर बाळासाहेब शितोळे जलतरण तलाव हद्दीतील तळमजल्यावरील हॉल बचत गटातील महिलांना महिन्याच्या मिटिंग, विविध कल्याणकारी योजनांची माहिती देणे, बचत गटातील महिलांना स्वयंरोजगाराचे प्रशिक्षण देणेकामी श्री साई संस्कार स्वयंसहायता महिला बचत गटास पुढील ५ वर्षाकरिता वापरण्यास देणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----

ठराव क्रमांक - ५२९ विषय क्रमांक - ४१
दिनांक - १५/०५/२०१२
सुचक :-मा.विनया तापकीर अनुमोदक:- मा.चंद्रकांता सोनकांबळे
संदर्भ:-मा.विनया तापकीर, मा.चंद्रकांता सोनकांबळे यांचा प्रस्ताव...

पिंपरी चिंचवड मनपाच्या ब प्रभागातील भाजीमंडई साफसफाईचे काम भारतीय महिला स्वयंरोजगार ही संस्था काम करीत आहे. ते काम ऑगस्ट महिन्यात संपत आहे. तरी ते काम अर्जुन आधार स्वयंरोजगार सेवा संस्था पुढील ३ वर्षे कालावधीकरिता करारनामा करुन कामाचा आदेश देण्यास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----

ठराव क्रमांक - ५३० विषय क्रमांक - ४२
दिनांक - १५/०५/२०१२
सुचक :-मा.विनया तापकीर अनुमोदक:- मा.चंद्रकांता सोनकांबळे
संदर्भ:-मा.विनया तापकीर, मा.चंद्रकांता सोनकांबळे यांचा प्रस्ताव...

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या चिंचवड जुना वॉर्ड क्र.६६ तालेरा रुग्णालय येथे स्थापत्यविषयक दुरुस्ती देखभाल व सुधारणांची कामे करणे (निविदा क्रमांक G४B/६/१२/११-१२). सदर कामाची निविदा रक्कम रुपये २३,३३,९७३/- इतकी असुन कामाचा निविदा दर १६.३०% कमी इतका आहे. निविदा रक्कमे इतके काम पुर्ण झाले आहे. परंतु चिंचवड,वाल्हेकरवाडी, थेरगाव व पिंपरी भागातील नागरीकांचे सोईसाठी तालेरा रुग्णालयाचे मागणीनुसार उर्वरीत देखभाल दुरुस्तीची कामे विषयांकीत कामातुनच करणेसाठी कामास रक्कम रुपये ४०,००,०००/- (रक्कम रुपये १६,६६,०२७ चे वाढीव खर्चासह) सुधारीत खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----

ठराव क्रमांक - ५३१ विषय क्रमांक - ४३
दिनांक - १५/०५/२०१२
सुचक :-मा.अश्विनी चिंचवडे-पाटील अनुमोदक:- मा.अरुणा भालेकर
संदर्भ:-मा.अश्विनी चिंचवडे-पाटील,मा.अरुणा भालेकर यांचा प्रस्ताव...

मनपा ब प्रभागातील निम्मे (आठ नाले) नाले कामाची तातडी व कामाचा पुर्वानुभव विचारात घेता मोरया स्वयंरोजगार संस्थेस मंजूर लघुत्तम निविदा दराने थेट पद्धतीने

साफ करुन घेण्यास व त्याकामी येणा-या प्रत्यक्ष खर्चास मान्यता देणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होण्याची वाट न पहाता ठरावाप्रमाणे कार्यवाही करणेत यावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----

यानंतर मा.सभापती यांनी सभा संपल्याचे जाहीर केले.

**(जगदीश शेट्टी)**
सभापती
स्थायी समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी- ४११ ०१८

पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी- ४११ ०१८. नगरसचिव कार्यालय
क्रमांक - नस/४/कावि/ ८१४ /२०१२
दिनांक - १८ / ०५ / २०१२ चे लगत

प्र. उपनगरसचिव
पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी ४११ ०१८.

प्रत- सर्व संबंधीत शाखाप्रमुख व शाखाधिकारी यांचेकडे
पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.

E:\e drive\Nagersachiv१\Standing १२-१७\Proceeding६A .doc